# स्वच्छ चलन धोरण

# सन-२०२४-२५

**राजारामबापू सहकारी बँक लि.,पेठ,(शेड्युल्ड बँक)**

प्रधान कार्यालय पेठ ,

ता.वाळवा , जि.सांगली.

# राजारामबापू सहकारी बँक लि.,पेठ, (शेड्युल्ड बँक)

बाजारातील खराब नोटा, तेलतट नोटा, फाटलेल्या नोटा आणि खोट्या नोटा यांचे प्राबल्य कमी होण्याच्या दृष्टीकोनातून रिझर्व्ह बँकेने चलनी नोटां संदर्भात धोरण आखावयाच्या सुचना दिलेल्या आहेत. या दृष्टीकोनातून आपले बँकेच्या संचालक मंडळाने रिझर्व्ह बँकेच्या सुचना विचारात घेऊन स्वच्छ चलनाचे धोरण खालीलप्रमाणे तयार केले आहे.

**अ)सदरच्या धोरणानुसार खालील बाबींचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे-**

1. शाखेकडे ग्राहकांनी भरलेल्या कागदी चलनांमध्ये फाटलेल्या किंवा चिकटवलेल्या नोटा आढळल्यास अशा नोटा ग्राहकांच्या विनंतीवरून स्विकाराव्यात व अशा नोटा स्वतंत्र ठेऊन ट्रेझरी मधून बदलून घ्याव्यात.
2. ग्राहकांना चांगल्या दर्जाच्या / नविन नोटा व नाणी यांचा पुरवठा त्यांच्या विनंतीनुसार व उपलब्ध असणा-या नोटांच्या प्रमाणात करणे आवश्यक आहे.
3. नोटा व नाणी व्यवहारांशिवाय बदलून देणेकामी देखील स्विकारणे आवश्यक आहे.

वरीलप्रमाणेची सेवा ही सर्व जनतेला कोणताही भेदभाव न करता सर्व कामकाजांच्या दिवशी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. तसेच वरील सेवा उपलब्ध असलेबाबत ग्राहकांना माहिती होईल अशा त-हेने जाहीरात करणे आवश्यक आहे.

**ब) काही महत्वाच्या व्याख्या व त्याचे स्पष्टिकरण-**

1. **मळकट/जुनाट नोटा** (Soiled Notes)**-** व्यवहारातील वापरामुळे ज्या नोटा मळकटलेल्या , फाटलेल्या (दोन्ही तुकडे उपलब्ध असणा-या) व जुनाट नोटा सरकारी देणी भागविणेच्या कामी किंवा खात्याला जमा करून घेता येतील मात्र अशा नोटा चलनात परत न आणता ट्रेझरीमधून बदलून घेणे आवश्यक आहे.
2. **फाटलेल्या नोटा** (Mutilated Notes**)** – अशा नोटा की ज्यांचा काही भाग फाटून गेलेला असेल / उपलब्ध नसेल. तसेच दोन भाग झालेल्या नोटा, अर्धवट जळालेल्या म्हणजेच निम्म्यापेक्षा जास्त भाग जळालेला किंवा फाटलेला असेल अशा नोटा स्विकारू नयेत.
3. **Soiled / Mutilated नोटा बदलून देणेबाबतची पध्दत-** एका दिवसात एका व्यक्तिला जास्तीत जास्त २० मळकटलेल्या नोटा रु.५०००/- पर्यंत किंमतीच्या बदलून घेता येऊ शकतील. मात्र यापेक्षा जास्त किंमतीच्या किंवा २० पेक्षा जास्त नोटा बदलून घ्यावयाच्या असतील तर बँकेचे व्यवस्थापन रिझर्व्ह बँकेच्या निर्देशानुसार चार्जेस घेणेबाबत ठरवू शकेल. तसेच एका दिवसात एका व्यक्तिला जास्तीत जास्त ५ फाटलेल्या नोटा किंवा जास्तीत जास्त रु.५,०००/- पर्यंत किंमतीच्या बदलून घेता येऊ शकतील. जर वरीलप्रमाणे लगेच नोटा बदलून देणे शक्य नसेल तर बँकेने सदरच्या नोटा संलग्न करन्सी चेस्टला पाठवाव्यात व ३० दिवसांत त्याची रक्कम सदरच्या खातेदाराच्या खात्याला जमा करणे आवश्यक आहे.

राजकीय पक्षाचा संदेश किंवा घोषवाक्य लिहीलेल्या नोटा तसेच नोटेच्या किंमतीत बदल केलेल्या नोटा कायदेशीर वैध चलन म्हणून वापरता येणार नाहीत. बँकेच्या प्रत्येक शाखेमध्ये "SOILED / MUTILATED NOTES ARE ACCEPTED AND EXCHANGED HERE" अशा आशयाचा बोर्ड लावणे अपेक्षीत आहे.

**ब) बँकेत शिल्लक असणा-या नोटांचे वर्गीकरण व साठवणूक-**

शाखेमध्ये येणा-या चलनाचे १०० च्या संख्येत बंडल तयार करावेत. अशा बंडलांना स्टेपल पिन करू नये. त्यासाठी प्लॅस्टिक पेपर, दोरा किंवा बँकेच्या नावाची पट्टी यांचा वापर करावा.

**शिल्लक नोटांचे वर्गीकरण-**

1. व्यवहारात वापरण्याचे चलन- शाखेकडे असलेल्या चुरगळलेल्या परंतु सरळ होणा-या नोटा, नवीन नोटा तसेच कोणत्याही प्रकारे मजकूर न लिहीलेल्या नोटा यांचा या वर्गात समावेश होईल.
2. व्यवहारात न वापरता येणारे चलन- तेलकट, मळकट आणि रंग गेलेल्या नोटा, डाग पडलेल्या नोटा या वर्गीकरणात येतील.
3. फाटक्या नोटा , डींकाने चिकटवलेल्या नोटा, सेलो टेपने चिकटवलेल्या नोटा, विभिन्न नंबर असलेल्या नोटा या वर्गात ठेवाव्यात. अशाप्रकारे वर्गीकरण करून व्यवहारात वापरता न येणारे चलन हे स्टेट बँक किंवा संलग्न ट्रेझरीमधून बदलून घ्यावे.
4. रिझर्व्ह बँकेस तीन सिंह असलेले चलन व्यवहारातून बाहेर काढून घ्यावयाचे आहे. म्हणून अशाप्रकारचे चलन ग्राहकास देऊ नये. वर नमुद केल्याप्रमाणे हे चलन बदलून घ्यावे.

**ड) नकली / बनावट चलन ओळखणे व जप्त करणेबाबत करावयाची कार्यवाही-**

1. **नकली / बनावट चलन ओळखणे-** नकली / बनावट नोटा तपासण्यासाठी उपलब्ध असणा-या मशिनचा वापर करून ग्राहकांकडून जमा झालेले चलन, तसेच एकत्रित शाखांकडून आलेले चलन इ. बनावट नसलेबाबतची खात्री करून घेणे अत्यंत आवश्यक आहे. कोणत्याही परिस्थीतीमध्ये बनावट नोटा ग्राहकास परत देऊ नये अथवा नष्ट देखील करू नये. जर बनावट नोट ग्राहकास परत दिली किंवा नष्ट केलेचा प्रयत्न केला तर संबंधिताने संगणमताने व मुद्दाम तसे कृत्य केले असे समजले जाईल व त्या व्यक्तिवर दंडात्मक कार्यवाही करणेत येईल.
2. **नकली/बनावट नोट आढळल्यास ती जप्त करणेबाबतची कार्यवाही-** जर वरीलप्रमाणे कार्यवाही करीत असताना बनावट नोट आढळली तर सदरच्या नोटेवर "COUNTERFEIT NOTE" असा शिक्का उमटवावा. त्याची स्वतंत्र रजिस्टरला नोंद करून ठेवावी. त्यासाठी सोबत जोडलेल्या Annex-I च्या नमुन्यात शिक्का असणे आवश्यक आहे. Annex-II मध्ये सदरच्या ग्राहकास पोहोच द्यावी. सदरच्या पोहोच पावतीवर चालू अनुक्रमांक असणे आवश्यक आहे.

   एका व्यवहारात जर चार नोंटांपर्यंत बनावट/नकली नोटा सापडल्या तर Annex-III मध्ये संबंधित पोलीस स्टेशनला माहिती द्यावी व त्याचबरोबर सदरच्या बनावट नोटा देखील

घ्याव्यात. जर एका व्यवहारात पाच किंवा त्यापेक्षा जादा बनावट नोटा एका व्यवहारात सापडल्या तर FIR करावी व Annex-IV मध्ये पोलीस स्टेशनला माहिती द्यावी. तसेच दरमहा वरीलप्रमाणे दाखल केलेल्या FIR ची प्रत व एकत्रीत मासिक माहिती प्रधान कार्यालयाकडील ऑडीट विभागास द्यावी. तसेच पोलीस स्टेशनला दिलेल्या नोटा व FIR ची पोहोच दप्तरी ठेवावी.

कॅश काऊंटरवर कॅश देत असताना , ATM मध्ये कॅश भरताना किंवा इतर बँक/ ट्रेझरी मध्ये भरणा करताना नोटांची पडताळणी करावी. रु.१००/- आणि त्यापेक्षा जास्त मुल्य असणा-या नोटा मशिनमध्ये चेक करूनच कॅश काऊंटरवर देणे, ATM मध्ये कॅश भरणे किंवा इतर बँक/ ट्रेझरी मध्ये भरणे आवश्यक आहे.जर ATM मधून बनावट नोट वितरीत झाली किंवा इतर बँक भरणा करताना बनावट नोट सापडली तर बँकेवर दंडात्मक कारवाई होऊ शकते. जर soiled /mutilated notes मध्ये किंवा cash balance (रोख शिल्लकेमध्ये), रिझर्व्ह बँक इन्स्पेक्टरला बनावट/नकली नोट सापडली तर सदर नोटेच्या किंमतीच्या दोन पट इतकी दंडात्मक कार्यवाही होऊ शकते.

बँकेने जिल्हावाईज Nodal Officer ची नेमणूक करावी व त्याची माहिती रिझर्व्ह बँकेचे विभागीय कार्यालयास व संबंधित पोलीस स्टेशनला कळवावी. बँकेने प्रधान कार्यालयात बनावट नोट दक्षता विभाग स्थापन करावा. बनावट नोट दक्षता विभागाने (FNVC) रिझर्व्ह बँक रिपोर्टींग , FIU-IND रिपोर्टींग तसेच त्याबाबतची सविस्तर माहीती शाखांना देणेचे काम करावयाचे आहे. बनावट नोटा दक्षता विभागाने (FNVC) दर तिमाही अखेरीस वरीलबाबत रिझर्व्ह बँकेच्या विभागीय कार्यालयास ई-मेल पाठवून माहिती देणे आवश्यक आहे.

भारतीय अर्थव्यवस्थेतील रोख रक्कम वापराचा विचार करता बँकेने प्रत्येक शाखेमध्ये ultra-violet lamp, तसेच Note sorting machine, Note counting machine तसेच बनावट नोटा ओळखण्याच्या मशिन बसविणे अत्यंत आवश्यक आहे. तसेच बनावट नोटांसंबंधीची काही माहिती / ट्रेंड उपलब्ध असल्यास ती माहिती RBI, FIU-IND व पोलिस स्टेशन यांना द्यावी. तसेच ज्या शाखांमध्ये कॅश शॉर्ट येईल किंवा बनावट नोटा सापडतील तेथे अनपेक्षीत रोख शिल्लक पडताळणी (surprise cash verification) करणे आवश्यक आहे. तसेच बनावट नोटांबाबतच्या सर्व नियमांची काटेकोरपणे अंमलबजावणी होत असलेची खात्री करणे अत्यंत आवश्यक आहे.

3. **नकली / बनावट नोटांसदर्भात रिझर्व्ह बँकेस रिपोर्ट पाठविणे-** बँकेच्या सर्व शाखांना सापडलेल्या / जप्त केलेल्या बनावट नोटांची दरमहाची माहिती पुढील महिन्याच्या ७ तारखेपर्यंत Annex-VI नमुन्यामध्ये रिझर्व्ह बँक इशू ऑफिसला कळविणे अनिवार्य आहे.

4. नकली/बनावट नोटा पोलीस स्टेशनकडून परत आलेनंतर कमीत कमी ३ वर्षे शाखेकडे जतन करून ठेवणे व त्याची माहिती ठेवणे आवश्यक आहे. तसेच बनावट नोट दक्षता विभागाने (FNVC) सर्व शाखांची एकत्रित माहिती ठेवणे आवश्यक आहे. तीन वर्षानंतर सदरच्या नोटा रिझर्व्ह बँक इशू ऑफिसला पाठविता येतील.
5. **कर्मचारी प्रशिक्षण-** जे कर्मचारी प्रत्यक्ष रोख रक्कम हाताळतात त्यांना बनावट नोटा ओळखण्या संदर्भातील माहिती व प्रशिक्षण वेळोवेळी देणे अत्यंत आवश्यक आहे. तसेच वारंवार होणारे बदल व महत्वाच्या सुचना इत्यादी माहिती वेळेवर उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

---